# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/12/2022 (शुक्रवार) सकाळ

---

## दुखापत

**पो.स्टे. भिवापूर** :– अंतर्गत कन्हाळगाव रिठी भिवापुर येथे दिनांक ०७/१२/२०२२ चे १७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– नथ्थु तानबाजी चौधरी, वय ६० वर्ष, रा. भोगेबोरी ता. भिवापुर, जि. नागपुर यांची रिठी शिवारात २० एकर शेती असुन त्यांच्या शेतीला लागुन त्यांचा पुतण्या आरोपी नामे– मुरलीधर किसन चौधरी रा. भोगेबोरी यांची शेती आहे. नमुद घटनावेळी फिर्यादी हे आपले शेतात गेले असता शेतातील पिकाला पाणी देण्याकरीता पाण्याची मोटार पंप ला लावुन असलेले पाईप त्यांना फेकलेले दिसले. म्हणुन फिर्यादीचे शेताजवळ शेत असलेले त्यांचा पुतण्या आरोपी क्र. ०१) मुरलीधर किसन चौधरी, वय ४५ वर्ष व त्यांचा मुलगा आरोपी क्र. २) नामे– दशरथ मुरलीधर चौधरी, वय २५ वर्ष, दोन्ही रा. भोगेबोरी, ता. भिवापुर यांना म्हटले की, ''तुम्ही माझे पाण्याचे पाईप का फेकले'' तेव्हा त्यांनी फिर्यादीला ''तुझे पाण्याचे आमच्या धु–यावरून जाते त्यामुळे आमचे शेतात पाणी जमा होते. तु आमचे जागेतुन पाण्याचे पाईप न्यायचे नाही'' असे म्हटले असता फिर्यादीने त्यांना ''माझे पाईप कुठुनही लिंक नाही मग तुमचे शेतात पाणी कसे जमा झाले. माझे शेतात पाणी नेण्या करीता दुसरी जागा नाही मी येथुनच पाईप नेईल'' असे म्हटले असता त्या दोघांनी फिर्यादीला शिवीगाळ करून झगडा भांडण केले तेवढयात फिर्यादीला मुरलीधर चौधरी याने पकडुन ठेवले. व दशरथ चौधरी याने शेतात पडुन असलेली वेळवाची काठी उचलुन फिर्यादीचे उजवे हातावर मारले. त्यामुळे फिर्यादीचे उजवे हाताचे मनगटावर व कोपऱ्यावर मार मारला व फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन भिवापुर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन सदर सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार विठ्ठल तितरमारे बं. न. १३९९ मो. क्र. ९८२३११२३९९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**